
# चैतन्य सुमने

अंक ९ | २२ ऑक्टोबर २०२५ – दिवाळी

## संपादकीय



‘चैतन्य सुमने’ या नियतकालिकाचा हा नववा अंक प्रसिद्ध करताना आनंद होत आहे. भक्तांची शब्द सुमने श्रींच्या चरणाशी वाहण्याची भावना लक्षात घेऊन संस्थानतर्फे एक व्यासपीठ उपलब्ध व्हावे या कल्पनेने हे नियतकालिक प्रसिद्ध करण्यात येत आहे. यापुढेही आपले लेख chaitanya.smaran23@gmail.com या ईमेल वर ‘चैतन्य सुमने साठी’ अशी नोंद करून पाठवाव्या.

॥ सर्व श्रीभक्तांना दिवाळीच्या शुभेच्छा ॥



प्रवचन परिमळ

# १९९५ च्या दिवाळी पाडव्याच्या दिवशी मालाड येथे झालेल्या पू. बाबा बेलसरे यांच्या निरूपणाचे शब्दांकन

आज आता दिवाळीचा खरा दिवस आहे ना! दिवाळी म्हणजे उत्सव. गंमत अशी आहे बघा! एक क्षणभर अध्यात्म बिध्यात्म जरा राहू द्या. सामाजिक मानसशास्त्र म्हणून एक विषय आहे. सोशल सायकॉलॉजी असा विषय आहे. तो एम. ए. ला, बी. ए. ला असतो, स्वतंत्र पेपरच असतो तो. त्या लोकांनी सर्व तऱ्हेचे समाज पाहून असा एक प्रत्यक्ष निर्णय काढला की, प्रत्येक समाजात उत्सव ठरलेले आहेत. उत्सवाशिवाय समाजच नाही. कारण काय आहे? माणूस हा उत्सवप्रिय प्राणी आहे बरं! उत्सवप्रिय प्राणी म्हणजे काय? उत्सवात आपण काय करतो? तेच सगळं बरं का! खाणं, पिणं काय असेल ते. पण रोजचं जे नेहमीचं आहे त्याच्यात बदल करतो. एक उदाहरण घ्या. तुकाराम महाराज म्हणाले, 'साधुसंत येती घरा तोचि दिवाळी दसरा' होय ना! म्हणजे ते आले की उत्सव! किंबहुना सत्पुरुषांच एक लक्षण असं आहे की बारा महिने त्याच्या घरी उत्सव! म्हणजे उत्सवाचं वातावरण.

मला एक गोष्ट आठवते. नाथांच एक ग्रंथ आहे, भावार्थ रामायण म्हणून. त्याचे चव्वेचाळीस अध्याय नाथांनी लिहिले आणि देह ठेवला. तर पुढचे अध्याय त्यांच्या एका शिष्याने लिहिलेले आहेत, उद्धव म्हणून. हा कोण? तर त्या काळी नाथांच्या घरी रोज उत्सव असायचा जणू काय! तर त्याला पुरणाची पोळी खायची हौस फार! तेव्हा तो आईला काय म्हणायचा? मला रोज पुरणाची पोळी पाहिजे. ती काय म्हणाली अरे, काय मी एकनाथ आहे, तुला रोज लेका पुरणाची पोळी घालू? त्या पोराने काय धरलं की, एकनाथ महाराजांच्या घरी रोज पुरणाची पोळी असली पाहिजे. म्हणून तो काय म्हणाला बापाला, मला त्यांच्या घरी नेऊन सोडा. बरं! तेव्हा हा गेला आणि सांगितलं महाराज म्हणले, आपल्याकडे आलो आहे या पोराला पुरणाची पोळी खायची रोज हौस आहे.



बरं झालं म्हणाले, 'माझ्या घरी रोजच पुरणाची पोळी होईल. येऊ दे म्हणाले त्याला' नाथानांच शोभतो बरं हे! तुमचं आमचं काम नव्हे! सांगण्याचा हेतू काय? रोज पुरणाची पोळी म्हणजे काय? तर रोजचं जे जेवण आहे ते की नाही रटाळ होतं. इंग्लिशमध्ये त्याला रूटीन म्हणतात बरं का! तोच तो पणा, तोच तो पणा! त्याच्यामध्ये काहीतरी बदल करावा म्हणून आपण उत्सव

करतो. दुसरं काय करतो आपण? नेहमीच्या रटाळ जीवनामध्ये काहीतरी इंटरेस्ट निर्माण करायचं म्हणून ते आपण करतो. बरं.

मग दिवाळीच्या उत्सवाचं महत्व काय आहे त्यातल्या त्यात? अहो नाही तर असं आहे, शिमग्याचा सुद्धा उत्सव आहे की हो! तो आणखी दिवाळी सारखी आहे का मला सांगा? त्याचं कारण निराळं आहे, या उत्सवाचं कारण निराळं. मग त्यात फरक असा आहे. दिवाळी आनंदाचा दिवस आहे. दिवाळीमध्ये आनंद करतो आपण. कसा आनंद करतो? आपण इतकी माणसं इथे आहोत. दुःखाची जाणीव विसरलात का तुम्ही? पोरांची परीक्षा आली आहे. आता काय होतंय कुणास ठाऊक? डोक्याला ताप आहे. नोकरीचं बुवा! इंटरव्ह्यू झाला आहे पण अजून काय पुढे काही मिळत नाही याची काळजी आहे. कुणी आजारी आहे. कुणाची पैशाची काळजी. कोण मला सांगा तुमच्यापैकी असा आहे की, ज्याला समस्या नाही जीवनाची... आणि मीही त्यामध्ये आहे... पण आपण काय करतो? ती (समस्या/काळजी) दाबून ठेवतो आणि वर आनंद करतो, दाखवतो तरी निदान. नाही का? म्हणजे आपल्यामध्ये सध्याची जी परिस्थिती आहे ती परिस्थिती बाजूला ठेवून मी आनंद करण्याची शक्ती माझ्यामध्ये आहे. हे झालं उत्सवाचं काम.

मग, अध्यात्मामध्ये... महाराजांच्याकडे हे (दिवाळी उत्सव) करण्याचं हेतू काय? इथे महाराज आहेत म्हणून... (पण कोणत्याही) सत्पुरुषाकडे जाऊन करण्याचा हेतू काय मग? त्याचं असं आहे की, तुम्ही आम्ही हा जो आनंद करतो. दिवे लावा, अमक करा, गोड खा, फटाके वाजवा, कपडे नवीन घाला, हे का करतो? तर त्या रटाळपणामध्ये थोडा बदल. पुन्हा उद्या तेच आहे, नाही का! सत्पुरुषांच म्हणणं असं की, तुम्ही असा उत्सव करा की वर्षभर टिकेल. अरे, वर्षभर टिकेल म्हणजे शक्य कसं आहे? त्याला उपाय असेल तर अध्यात्म हाच उपाय आहे. म्हणजे काय? तर माझी जी परिस्थिती आहे ती रटाळच राहणार बरं!

सत्पुरुषांच म्हणणं असं की, तुम्ही असा उत्सव करा की वर्षभर टिकेल. त्याला उपाय असेल तर अध्यात्म हाच उपाय आहे. तर माझी जी परिस्थिती आहे ती रटाळच राहणार बरं! प्रपंचामध्ये कटकट, कटकट सारखी राहणारच. पण त्या कटकटीमध्ये माझं मन आनंदात ठेवायचं असेल तर ते सत्पुरुषाची उपासनाच ठेवू शकते म्हणून हे करायचं.

तुरूंगासारखं आहे ते. अरे! तुरूंगात वाढदिवस आला म्हणून काय गोड करतो काय तुम्हाला तो? नाही करीत. तसं प्रपंचामध्ये असंच राहणार. कटकट, कटकट सारखी राहणारच. पण त्या कटकटीमध्ये माझं मन आनंदात ठेवायचं असेल तर ते सत्पुरुषाची उपासनाच ठेवू शकते म्हणून हे करायचं.

मला एक फार गंमत वाटली. आज वर्तमानपत्र मी जेव्हा पाहिलं ते टाईम्स ऑफ इंडिया मध्ये दोन फोटो दिलेले आहेत बरं का! एक फोटो या ग्रहणाचा, एक फोटो असा आहे की पूर्ण सूर्य झाकला गेला असा एक फोटो आहे आणि दुसरा फोटो आहे त्याच्या शेजारी त्याच्यामध्ये त्याचं तेज बाहेर पडत आहे, अंगठी सारखं दिसत ते. त्यांनी म्हटलंच आहे ते डायमंड लाईट

(diamond light) म्हणून. म्हणजे हिरा जसा चमकावा एखाद्या अंगठीमध्ये तसं ते आहे. काय ते चंद्राची एक व्हॅली आहे त्याच्यातून तो प्रकाश बाहेर पडला. म्हणजे अध्यात्माच्या आनंदामध्ये आणि बाकीच्या उत्सवाच्या आनंदामध्ये फरक असा आहे, तुम्ही कितीही जरी ते तेज दाबलंत तरी तो उफाळून येईल. म्हणजे आत्म्याचा जो आनंद आहे तो आनंद किती जरी परिस्थिती वाईट असली तरी तो दबणार नाही. गंमत अशी आहे, तुम्हाला माहिती असेल, अत्यंत दुःखाचा प्रसंग आलेला आहे. माणूस झोपी जातो. काय होतं त्यावेळेला? त्यावेळेला ते दुःख विसरतो आणि आत्म्याच्या आनंदात जातो. झोप हे अज्ञानाचं लक्षण आहे. अज्ञानामध्ये सुद्धा आपणं जर देहाला विसरलो, झोपेत का होईना आपल्याला आनंद मिळतो अज्ञानामध्ये! तर बोलून चालून ज्ञानाचा जो आनंद आहे त्याच्यामध्ये काय अवस्था होईल? त्याला पत्ता राहणार नाही. घरात काय चाललंय किंवा जीवनात काय चाललंय. त्याचा जो मार्ग आहे, तो मार्ग हे अध्यात्म आहे. हे थोडसं तात्त्विक होत आहे. पण हे काय करायचं एवढं सगळं?

एक साधी गोष्ट घ्या. आपण इथे भजन करताना नाचतो, बरं का! तुम्ही ऑफिसर आहात. तुमच्याकडे क्लार्कने पाहिलं तर (म्हणेल), हे काय बुवा! साहेब नाचत होते आमचे. अरे! नाचण्याचा जो आनंद आहे तो तुम्ही भोगता ना उत्सवामध्ये? कशाकरता तर दुःखाला बाजूला सारून माझं मन त्या आनंदात राहू शकतं. त्या आनंदाला समाधान असं म्हणतात. तेव्हा माझं समाधान सर्व परिस्थितीमध्ये टिकेल या करिता हा उत्सव आहे बरं! मग, आजचा दिवस काय? आता हा पाडवा म्हणतात ना! हा साडेतीन मुहूर्तापैकी एक मुहूर्त आहे म्हणतात ना? त्याला काय दुसरं ज्योतिष वगैरे लागत नाही. काय हो हे आहे? याच्यामध्ये असं आहे की, हे होण्याकरता मनामध्ये क्रांती व्हावी लागते, बदलावं लागतं. एकदम दृष्टिकोनच बदलावा लागतो. त्याला क्रांती म्हणतात. बाहेरच्या क्रांत्या पुष्कळ आहेत.

आता ह्या युगामध्ये आपण जगलो, फार छान झालं. साधारण या एकोणीसशे तीस ते चाळीस ह्या वर्षांमध्ये जेव्हा स्टॅलीन पॉवरमध्ये होता, अडीच हजार लोक त्याने मारून टाकले एका रात्रीत बरं का! आणि एक कम्युनिझम स्थिर केला. तर एक ग्रंथ आहे. जगातले मोठे, मोठे विचारवंत कम्युनिजम बद्दल नाराज झाले आणि त्यांनी त्याच्या विरुद्ध मत दिलं. आणि नावं काय घ्या? अँड्रयू गिल (Andrew Gill) म्हणून नोबेल प्राईज मिळालेला फ्रेंच माणूस. बर्ट्रांड रसेल (Bertrand Russell) मला नावं सांगण्याचं म्हणून नाही. सांगायचं कारण त्याने एक ग्रंथ लिहिला. 'The God that failed!' कम्युनिझम आम्ही ईश्वर समजत होतो आणि तो ईश्वर नालायक ठरला. त्याचं प्रत्यंतर आलं आपल्याला अलिकडेच. झालं कम्युनिझम गेला. सगळं विलक्षण! सगळं बदललं. पण एकच इझम (ism) कायम राहिला. तो असेल तर अध्यात्म आहे. ज्ञानेश्वर महाराजांनी जे मिळवलं उत्सवाच्या निमित्तानं ते आज सुद्धा आहे. मग काय करायला पाहिजे की, माझं समाधान काही झालं तरी टिकलं पाहिजे. याच्याकरता ज्याच्याजवळ समाधान आहे, त्याला धरला पाहिजे. तो असेल तर परमात्मा आहे. परमात्म्याची जरूर काय आहे? त्याची आहे. त्याला धरलं पाहिजे. त्याला धरायचं म्हणजे काय? मग सांगतो आपल्याला, ती सत्ता आहे बरं का!

सत्तेचं उत्तम उदाहरणं तुम्हाला सांगतो बरं का! आपले पंतप्रधान आहेत ना! त्या पंतप्रधानांनी एक ग्रंथ लिहिलाय काहीतरी. त्याचे उतारे मी वाचले, ते पेपरमध्ये, टाइम्स ऑफ इंडियामध्येच आले होते. त्याच्यामध्ये काहीतरी उलट सुलट लिहिलेलं आहे. काय त्याचं मोठेपण झालं बघा जगात! वर्तमानपत्रात छापून बिपून (आलं). तुम्ही आम्ही एखादी कादंबरी

लिहिली असली अचकट विचकट, कुणी विचारील का? कोणी विचारत नाही. कश्यामुळे आहे हो हे? खुर्चीचा मान आहे. सत्ता आहे ना एवढी! आज हिंदुस्तानच्या राज्यावर केवढी सत्ता आहे. या सत्तेचं लक्षण काय आहे? तुम्हाला दिसते का ही सत्ता? तुम्ही विकत घेऊ शकता का? काय आहे त्याला? इंद्रियांचे धर्म त्याला आहेत का? ती सत्ता ऐकायला येते का, दिसते? एक उदाहरणच सांगतो आपल्याला, सत्तेची गंमत. जेव्हा आपण स्वतंत्र झालो आणि नवीन राज्य सगळं सुरु झालं. त्यावेळेला आपली जी घटना आहे या घटनेमध्ये आणि अमेरिकन घटनेमध्ये फरक आहे. तो काय फरक आहे? अमेरिकेमध्ये अध्यक्ष जो आहे हाच मंत्रिमंडळाचा अध्यक्ष असतो. इथे कसं आहे? राष्ट्रपती निराळा आणि पंतप्रधान निराळा. आणि गंमत अशी, पंतप्रधानाचे जे हक्क आहेत ते राष्ट्रपतीला नसल्यासारखे आहेत बरं का! पंतप्रधानांनी सुचवायचं आणि त्यांनी नुसती सही करायची. माहित आहे ना आपल्याला? तर डॉ. राजेंद्रप्रसाद हे राष्ट्रपती होते. हा साधुपुरुष होता बघा! अतिशय बुद्धिमान. तो पीएच डी (PhD) मनुष्य होता. अतिशय बुद्धिमान पण अतिशय साधा. पण अतिशय धार्मिक होता. कुंभमेळयामध्ये सबंध ते पोलिस बिलीस घेऊन तो स्नानाला गेला तिथे, नेहरूंना आवडलं नाही. पुढे काय व्हायला लागलं? त्यांच्यात मतभेद व्हायला लागले, विशेषतः काश्मीरच्या प्रश्नावर, बरं का! तेव्हा दिल्लीचं लॉ कॉलेज जेव्हा उघडलं त्यावेळेला युरोपियन चीफ जस्टीस होता तो अध्यक्ष सभेचा. तेव्हा राष्ट्रपती आलेच होते. राजेंद्रप्रसादनी ते (कॉलेज) उघडलं. तेव्हा त्यांनी काय प्रश्न काढला की बुवा, आमच्या देशामध्ये ही नवीन जी घटना आलेली आहे, यामध्ये राजसत्ता कोणाच्या हातात आहे? पंतप्रधानाच्या का राष्ट्रपतीच्या? अरे  सत्ता दिसतं नाही, काही नाही, तिथे तो प्रश्न आला. इथे तो प्रश्न नाही. इथे सत्ता एकच, ती तुमच्या गुरूच्या आणि देवाच्या हातात आहे बरं का!

मग सत्तेला आवाहन करायचं म्हणजे काय करायचं? पहिली गोष्ट अशी आहे सत्ता ही व्यापक आहे. तेव्हा अनेक माणसांनी जर सत्तेला आवाहन केलं तर सत्ता प्रसन्न होते आणि तुम्हाला मदत करते बरं का!

सत्तेचा धर्म काय आहे? सत्तेला आवाहन केले की सत्ता ताब्यात येते. आपलं आता काय होतं बघा! समजा, तुमची काही चोरी झाली आणि तुम्ही गेलात पोलीसकडे आणि सांगितलं... म्हणजे सत्तेला आवाहन करता तुम्ही! तुम्हाला माहित असेल हो गणपती आपणं आणतो ना! त्या गणपतीला जोपर्यंत तुम्ही प्राणप्रतिष्ठा (करित नाही) तोपर्यंत माती आहे ती. समजा त्याचा हात तुटला म्हणजे प्राणप्रतिष्ठा करायच्या आधी. तर काही नाही दुसरा गणपती आणला, मातीच ती! पण प्राणप्रतिष्ठा केल्या नंतर सत्ता आली त्याच्यामध्ये. आणि मग जर हात तुटला, तर मग यावर्षी मॅट्रिकचं वर्ष आहे काय करावं? पंचाईत आली. कारण त्याच्याकडे सत्ता आलीये ना!

मग सत्तेला आवाहन करायचं म्हणजे काय करायचं? पहिली गोष्ट अशी आहे सत्ता ही व्यापक आहे. तेव्हा अनेक माणसांनी जर सत्तेला आवाहन केलं तर सत्ता प्रसन्न होते आणि तुम्हाला मदत करते बरं का! हे सगळं तुम्हाला शास्त्र सांगतोय मी. सोशल फिलॉसॉफी सांगतोय. आपल्याकडे कल्पना आहे बघा! काय आहे की, पृथ्वीवरती अनाचार फार झाला. दुष्टांच

साम्राज्य आल्यावर सज्जनाला जगणं कठीण व्हायला लागलं. असं झाल्यानंतर पृथ्वी गायीचं रूप घेते आणि ती शेषशायी भगवंताकडे जाते. शेषशायी याचा अर्थ असा तो गार असतो. शेष हा नाग आहे. तो गार असतो आणि त्याला वर ते फडा असतात ना! त्यामुळे छाया करतो. तर हा निजलेला असतो परमात्मा. म्हणजे आत्मसत्ता जी असते, परमात्मसत्ता, ही झोपी गेलेली असते. म्हणजे तिला प्रतिक्रिया नाही. मग तिला जागं करून प्रतिक्रिया करायला लागतं. तेव्हा ही गाय ऋषी मुनींना घेऊन तिथे जाते आणि प्रार्थना करते. त्यावेळेला तो जागा होतो, आणि म्हणतो काय बुवा काय कशा करता येणं झालं? तर म्हणाले अमक तमक झालंय. मग तो सांगतो, मी अमक्या अमक्या ठिकाणी येणार आहे, अमक करणार आहे बरं का! तसं परमात्मसत्ता सगळीकडे आहे. ती इथेही आहे. तिला आवाहन करायला सगळ्या माणसांनी एकत्र यावं लागतं. तेव्हा आपण इतके लोकं जे इथे आहोत, हे उपासना करून मनापासून नामस्मरण म्हणा, उपासना म्हणा, पूजापाठ म्हणा. त्यावेळेला ती सत्ता जागी होते आणि ती जागी झाल्यानंतर काय होतं सांगतो आपल्याला.

'मी प्रपंच सुधरा असं म्हणत नाही. पण सुधारला तर पाहिजे आहे मला. पण मला काय पाहिजे आहे? काहीही परिस्थिती आली तरी माझं समाधान बिघडणार नाही एवढं आपण करा. तुम्ही आनंदस्वरुप आहात, आनंद म्हणजे समाधान. काही जरी प्रसंग आला? तरी माझं समाधान बिघडणार नाही एवढं आपण करा' अशी जर आपण प्रार्थना केली तर आज बरोबर काम होणार हे लक्षात ठेवा.

एक विनय पत्रिका नावाचा तुलसीदासांचा ग्रंथ आहे. त्याच्यामध्ये भगवंताला विनंती केलेली आहे. विनय-पत्रिका, विनंतीच. आपण असे आहोत, तसे आहोत, तू मला कृपा कर बरं का! म्हणजे मी असा पापी आहे. पण तुझ्यासारखा पाप हरण करणारा कुणी नाही असं सगळं वर्णन आहे. तेव्हा हा अर्ज आहे. त्यांनी काय कल्पना केली आहे की, तुलसीदासांचा, रामाने माझ्यावर कृपा करावी असा अर्ज आहे. त्याला उर्दूमध्ये दरख्वास्त म्हणतात. आपल्याकडे आता ॲप्लिकेशन म्हणतात! तेव्हा त्यांनी काय ॲप्लिकेशन केलाय? पद रचली आणि शेवटी मारुतीला काय सांगितलं? तू बुवा रामाच्या जवळ नेहमी असतोस, तेव्हा तू असं कर की हा माझा अर्ज आहे. तेव्हा राम खूश आहे असं पाहून त्याच्या हातात दे. दरबार भरलेला आहे तेव्हा त्या दरबारामध्ये रामाच्या हातात जाईल असं कर. मारुती त्याला काय म्हणाला? ती खुबी आहे भक्ताची. म्हणाला, तुझं म्हणणं बरोबर आहे. पण मी आहे त्याच्या पायापाशी! त्याच्या शेजारी बसलेली सीता आहे ना! तिचा अंमल जास्त आहे रामावर. काय सांगू तुम्हाला? सत्पुरुषांच प्रेम. महाराजांना म्हटलं, 'असं कसं लिहिलंय त्यांनी?' महाराज म्हणाले, 'हा बांगड्यांचा वशिला आहे' कसं भक्त कसे असतात बघा! तुम्हा आम्हाला सगळ्यांना माहित आहे बांगड्यांचा वशिला काय आहे तो! तक्रार करायची असेल तर मिनीस्टरच्या ऐवजी त्याच्या बायकोला जाऊन सांगावं म्हणजे तो काम करील. खुंटी तरी घालते हो ती! असं काय करता? सांगण्याचा हेतू काय? मग सीतेच्या हातात अर्ज गेला. 'काय आहे' म्हणाली. तर म्हणाले, 'तुलसीदास म्हणून एक आहे आणि त्याला आपली कृपा पाहिजे'. तर मग रामाकडून तुला काय पाहिजे? तर काही नाही, त्या अर्जावरती रामाने सही करावी. पण सही करताना रिमार्क काय पाहिजे? 'तू माझा आहेस' एवढा रिमार्क पाहिजे आणि सही करू दे. माझं

काम झालं म्हणाले. बरं का! तेव्हा तिने हे केलं. मी हे सांगतो त्याच्याशी संबंध आहे उत्सवाचा म्हणून. तेव्हा सीतेने (अर्ज) दिला हातामध्ये. रामचंद्र खूश होते. दरबारात बसलेले. सगळा आनंद झालेला, खूश आहे. 'काय आहे म्हणाले?' तर म्हणाले बुवा असा, असा एक तुलसीदास नावाचा गृहस्थ आहे. तो इतकं नामस्मरण करतो की, त्याला रामबोला असं म्हणतात. तुलसीदास नाव गेलंच! पण रामबोला असं त्याला म्हणतात आणि तो आपल्या दारी आलेला आहे. 'मी अपात्र आहे' हे तो जाणतो पण आपण अपात्रावरती कृपा करता अशी आपली कीर्ती ऐकलेली आहे. तेव्हा आलेलो आहे मी. तेवढं आपण दस्तुरखुद्द करा, साईन करा. अहो काय आहे? पंतप्रधानांची सही व्हायची म्हणजे काय मोठं काम आहे. नाही का! आपण पाहातो ना! सही नाही तर दोन, दोन वर्षे पेन्शन मिळत नाही असं म्हणत्तात! तेव्हा रामाने विचारलं दरबारामध्ये, बुवा असा असा अर्ज आलाय. कुणी नाव ऐकलं आहे का? तेव्हा संत उठले आणि म्हणाले, 'आम्ही नाव ऐकलंय संत तुलसीदास हा आणि फार भक्त आहे मोठा! नाम घेतो आपलं. तेव्हा काय कारण काय आहे?' 'तो म्हणतोय मला तुम्ही आपलं म्हणा' बरं का! तर म्हणले काय करावं? सगळे म्हणाले, 'अहो! म्हणा त्याला आपलं म्हणा. तो नाम घेतोय तो धोका द्यायचा नाही आपलं म्हणून' नाही तर आपलं म्हटल्यानंतर...'समर्था घरीचे श्वान तयासी देती सर्व मान' असं नाहीये म्हणाले. तेव्हा रामाने तुलसीदासांकडे पाहिलं आणि त्याच्यावरती सील (seal) केलं म्हणाना. सील ठोकलं त्याच्यावर सही केली आणि परत केलं. तुलसीदासांच समाधान झालं.

ह्याचा अर्थ असा, राम ही सत्ता आहे त्या सत्तेला आकार नाही. त्या सत्तेला आवाहन करावं लागतं. ते आवाहन आपण करीत आहोत. या सगळ्या स्त्री पुरुषांचं मन एके ठिकाणी आलेलं आहे. अरविंदांनी असं म्हटलेलं आहे की, ज्या वेळेला समाजामध्ये एखादा शूर किंवा जबरदस्त कार्यकर्ता निर्माण होतो त्यावेळी त्या समाजातील अनेक लोकांच्या मनात अस सारख येत की असा मनुष्य पाहिजे, असा मनुष्य पाहिजे त्यावेळी तो जन्माला येतो म्हणाले. त्यांच्या इच्छेचं साकार रूप होऊन जन्माला येतो. तसा आज पाडवा आहे ना! माझी आपल्याला विनंती अशी आहे बरं का! माझा अधिकार नाही. पण सत्य ते सत्यच आहे ना! की आपण इतके दिवस करतो आहोत. इतक्या प्रेमाने आपण इथे नाम घेतो. महाराजांना आवाहन करा ना प्रत्येकाने मनामध्ये... काय आवाहन करा? प्रपंच सुधरा म्हणू नका. म्हणावं असं... म्हणजे ही थोडी लबाडीच आहे काय? असं म्हणावं, 'मी प्रपंच सुधरा असं म्हणत नाही. पण सुधारला तर पाहिजे आहे मला. पण मला काय पाहिजे आहे? काहीही परिस्थिती आली तरी माझं समाधान बिघडणार नाही एवढं आपण करा. तुम्ही आनंदस्वरुप आहात, आनंद म्हणजे समाधान. काही जरी प्रसंग आला? तरी माझं समाधान बिघडणार नाही एवढं आपण करा' अशी जर आपण प्रार्थना केली तर आज बरोबर काम होणार हे लक्षात ठेवा. कारण असं आहे की, जसं तुलसीदास हे नाव ऐकलंय संतानी आणि त्यानी रामाला सांगितलं की तू कर (म्हटल्यावर त्याने सही केली) तसं आपल्यामध्ये जे खरे नाम घेणारे लोक आहेत त्यांनी त्यांची प्रार्थना केल्यानंतर त्यांना की नाही पान्हा फुटलाच पाहिजे यात शंका नाही. त्यांना मागावं!

ते जाऊ द्या सगळं. मला सांगायचं आहे काय? की आजचा दिवस खरोखरच फार छान आहे. आपण सगळे एका विचारांनी भारलेले लोक. तुम्ही जरा बाहेर बघा काय आहे? या शहरात तुम्ही वर्तमानपत्र वाचलं तर काय? बलात्कार केला, खून झाला, लूट झाली हेच तुम्ही वाचता ना? काय समाजाची परिस्थिती आहे लक्षात घ्या. आज ऐंशी वर्षापूर्वी महाराज बोलून

गेले की, पुढचा काळ फार कठीण येणार आहे. सज्जनाला सज्जनपणे जगणं कठीण होणार आहे. आज कसं आहे, कुटुंबामध्ये तुमच्या मुलीचा तुम्हाला भरवसा नाही. मुलाचा भरवसा नाही. शेजाऱ्याचा भरोसा नाही. काय परिस्थिती आहे मला सांगा! कशावर, कोणावर विश्वास टाकणार तुम्ही? किती अनाचार आणि भ्रष्टाचार आहे. पण त्याला नावं ठेवून (काय) करायचं काय? आपल्या हातात ते नाहीच आहे ही फार अतिशय कठीण गोष्ट आहे. समाजामध्ये क्रांती झाली तरच होणं आहे. ती सुद्धा कम्युनिझमची क्रांती नव्हे, ती बाहेरची क्रांती आहे. आतली क्रांती पाहिजे. कृष्णमूर्तींचं एक पुस्तक आहे, त्याच्यात शेवटचं वाक्य त्या पुस्तकामध्ये 'दि ओन्ली रेव्होल्यूशन इज दि इनर रेव्होल्यूशन' (the only revolution is the inner revolution) फार बरोबर आहे. आतून क्रांती व्हायला पाहिजे की, मी मागतोय मला द्या तुम्ही. मला समाधान पाहिजे आहे. परिस्थिती मी अडवू शकत नाही. पण त्यामध्ये मला समाधान तुम्ही द्या आणि मी सांगितलं ना! आपण करतोय एवढं त्याचं त्यांना कौतुक आहे. आपण ते आहेत म्हणूनच करतो आहोत. त्यांचं अस्तित्व आहे यात शंकाच नाही. त्याशिवाय आपण इतके प्रेमाने इथे बसतच नाही आणि माझ्यासारख्याचं रटाळ तुम्ही ऐकूनच घेत नाही. त्यांचं अस्तित्व आहेच आहे. तर त्यांना मागावं, मनापासून मागावं. ज्याने त्याने मनापासून आपलं मागावं. 'मला द्या! तुम्हाला असं वाटत असेल की नाम घेण्याने मला हे मिळेल तर ते नाम घेण्याची बुद्धी द्या आणि शक्ती द्या.' नुसती बुद्धी नाही. बुद्धी सगळ्यांना आहे. प्रत्येकाला वाटतं नाम घ्यावं पण घेत नाही. कारण शक्ती कमी पडते ना! 'ती शक्ती द्या आणि बुद्धी द्या, आपण द्या!' मला खात्री आहे, जसं रामाने सही केली, तसं की नाही ते आपलं ऐकतील.किंबहुना, मी असं म्हणेन ते वाट पाहतायत हा लेकाचा मागतो केव्हा आणि मी देतो केव्हा आहे. अशी अवस्था आहे. तेवढं तुम्ही करा म्हणजे मग दिवाळी साजरी केल्याचं हे (सार्थक) आहे. नाही तर काय होतं, आज दिवाळी! संध्याकाळी भाऊबीज! काय ते भावाने काहीतरी दिलं बहिणीला आणि झालं की संपलं! पुढे उद्या कटकट आहेच. आहे, रेल्वेचा प्रवास आहेच पुन्हा! दिवाळी कसली आली आणि काय नाही का? या जीवनामध्ये त्याशिवाय समाधान नाही मिळणार आणि समाधान नाही तर जीवन कसलं मला सांगा?

तुम्हाला माहीत असेल ना, 'ले मिझरेबल' (Les Misrables) लिहिणारा व्हिक्टर ह्यूगो त्या कादंबरीचं मराठी भाषांतर सुद्धा आहे मोठं. तेव्हा त्याचं काय झालं, त्याला एकच मुलगी आणि त्या मुलीचं नवऱ्याशी भांडण झालं आणि घटस्फोट घेतला नाही. पण ती घरी आली. बायको मेलेली होती. हा बाप आणि मुलगी. एकोणीस वर्ष हा जगला. एकोणीस वर्ष ती बोलली नाही. मौन धरलं, बरं का! काय जीवन मला सांगा? एवढ्या कादंबऱ्या लिहिल्या, जगप्रसिद्ध कादंबऱ्या... पुढे काय? या मोठ्या माणसांचं दुःख हे असं असतं. ते नाही. आम्हाला पाहिजे, आम्हाला समाधान पाहिजे. असेल अशी परिस्थिती, आज माझ्या मनासारखं होत नाही, समाधान पाहिजे. ते त्यांच्याजवळ मागा आणि नाम ही त्याची किल्ली आहे. त्यांचं अस्तित्व तुमच्या घरात भासल्याशिवाय राहणार नाही. हे मी काहीतरी सांगतो असं नाही हां! ती सत्ताच अशी आहे की, त्या सत्तेला मनापासून आवाहन केलं की ती आलीच पाहिजे. कारण ती जणू काही प्रतिक्रियेची वाट पाहत असते. आपल्याकडून क्रिया होत नाही बरोबर की नाम घेताना तू माझ्या जवळ आहेसच ही जर भावना झाली ना! आहे म्हणजे आहेच यात शंकाच नाही आणि त्याची प्रचीती आपल्याला येईल! एवढा फायदा आपण करून घ्यावा. आता उद्यापासून नेहमीचं रटाळपण आहे जीवनाचं, ते तर चालूच आहे.

स्वानुभव सुमने

# एक अविस्मरणीय वारी

श्री ब्रह्मानंद महाराज पुण्यस्मरणानिमित्त कोरेगाव ते गोंदवले पायी वारी

सर्वपित्री अमावास्येला श्रीब्रह्मानंद महाराजांचा पुण्यतिथी दिवस असतो. त्यांनी आपले संपूर्ण जीवन हे श्रीमहाराजांच्या पायी समर्पित केले होते आणि आजही सत्तारूपाने गोंदवल्यात श्रीमहाराजांची सेवा करीत आहेत. त्यांनी घेतलेले साधनांचे कष्ट हे खरोखरीच चिंतनीय आहेत. त्यांच्या साधनेबद्दल, दास्यभक्तीबद्दल, गुरुवचनावर आणि गुरुचरणावर असलेला त्यांचा दृढ विश्वास, आणि रामनामासाठी वाहिलेली जिव्हा यामुळे श्रीमहाराजांनी त्यांना आपल्यासमान केले. पेढा कसाही खाल्ला तरी तो गोडच लागणार, पण त्याची गोडी अनुभवण्यासाठी तो खाल्ला पाहिजे हा विचार मनात धरून आणि श्रीब्रह्मानंद महाराजांबद्दल सर्वार्थाने कृतज्ञता व आदर व्यक्त करण्यासाठी सर्वपित्री अमावास्येच्या आधी कोरेगाव ते गोंदवले पायी वारी करून श्रीमहाराजांचे दर्शन घ्यावे या उद्देशाने हा उपक्रम ठरविला होता. या उपक्रमात आपल्या आरती मंडळातील एकूण २६ साधकांनी (महिला आणि पुरुष मिळून) तन, मन, धनाने सहभाग घेतला होता.



१३ सप्टेंबर रोजी संध्याकाळी आम्ही सर्वजण गोंदवल्याला पोहचलो. त्या रात्री झालेल्या बैठकीमध्ये या उपक्रमाचे गांभीर्य सर्वांना सांगण्यात आले. श्रीब्रह्मानंद महाराज कोरेगाव रेल्वेस्टेशनवर उतरले आहेत आणि आपण सर्वजण त्यांच्या समवेत गोंदवल्याला जाण्यासाठी त्यांना receive करण्यासाठी रेल्वेस्टेशनवर जायचे आहे. या उत्कट भावनेने १४ सप्टेंबर रोजी पहाटे ४.३० वाजता गोंदवल्यातून निघून कोरेगाव रेल्वेस्टेशन येथे ५.३० वाजता पोहोचलो. आणि काय आश्चर्य! आम्ही रेल्वेस्टेशन बाहेर पोहोचताच त्याक्षणी एक रेल्वे आमच्यासमोरच फलाटावर आली आणि आम्हा सर्वांचेच डोळे पाणावले. आम्ही सर्वजण फलाटावर गेलो.



श्रीब्रह्मानंद महाराजांचे पुण्यस्मरण करून आम्हाला तुमच्याबरोबर गोंदवल्याला श्रीमहाराजांच्या दर्शनाला न्या अशी विनंती करून त्यांच्या बरोबर स्टेशनच्या बाहेर आलो. तेथे महिलांनी श्रीब्रह्मानंद महाराजांना औक्षण केले. आम्ही गोंदवलेच्या दिशेने तोंड करून श्रीमहाराजांची आणि श्रीब्रह्मानंद महाराजांची आरती म्हणून पायी वारीला सुरवात केली. प्रत्येक साधकाने श्रीब्रह्मानंद महाराजांचा फोटो हातात घेऊन अनवाणी थोडे अंतर चालावे असे ठरविले होते. श्रीब्रह्मानंद महाराज श्रीमहाराजांना

भेटल्याशिवाय अन्न, पाणी काहीही घेत नसत त्यामुळे श्रीब्रह्मानंद महाराजांचा फोटो घेऊन आम्ही पहाटे ६ वाजता चालायला सुरवात केली.

श्रीब्रह्मानंद महाराज हे त्या क्षणापासून जे चालायला लागले ते गोंदवल्यात संध्याकाळी ५च्या सुमारास श्रीमहाराजांचे दर्शन घेतल्यावरच थांबले. वाटेत कुणीही प्रापंचिक गप्पा करायच्या नाहीत, मोबाईल फक्त न्याहारी आणि जेवणाच्या वेळेस बघायचा हे कटाक्षाने पाळले. श्रीब्रह्मानंद महाराजांबरोबर २ साधक कायम ठेऊन त्यांनी अखंड श्रीरामनामाचा जप केला. (दम लागल्यावर किंवा घाटात चढ चढताना मनांत जप केला) श्रीब्रह्मानंद महाराजांचा फोटो घेऊन चालताना एक वेगळा अध्यात्मिक अनुभव प्रत्येकाने अनुभवला. रामनामाच्या उच्चाराच्या एका विशिष्ठ लयीत चालल्यामुळे आणि फोटो घेणारे ताजेतवाने असल्यामुळे चालण्याचा वेग हा कायम जास्त राहिला त्यामुळे ४८ किलोमीटरचे अंतर अवघ्या ११ तासात पार करता आले. १३ सप्टेंबरला रात्री ८.३० च्या दरम्यान गोंदवल्यात जोरदार पावसाला सुरवात झाली ती पहाटे १.३० वाजेपर्यंत पाऊस पडला. आणि १४ सप्टेंबर रोजी संपूर्ण दिवस ढगाळ हवामानामुळे उन्हाचा अजिबात त्रास झाला नाही, केवढी श्रीमहाराजांची कृपा! पावसामुळे संपूर्ण सिमेंटचा रास्ता अक्षरशः धुवून स्वच्छ झाला होता. रस्त्याच्या दोन्ही बाजूला झेंडूची फुले तसेच हिरवीगार शेते यामुळे जणू पायघड्या घातल्या आहेत असेच वाटत होते. रस्त्यावर वाहनांची वर्दळ सुध्दा खूप कमी होती. वातावरणात गारवा होता आणि मोकळ्या हवेमुळे रामनामाच्या नादात अत्यंत प्रसन्न वातावरणात वारी संपन्न झाली.




१) न्याहारी आणि जेवण याचे कॉन्ट्रॅक्ट ज्यांना दिले होते त्यांनी दुचाकीवर मागे क्रेट बांधून कोरेगाव येथून आम्ही चालत जेथपर्यंत पोहोचलो आहोत तेथपर्यंत येऊन आम्हाला प्रसाद दिला. यासाठी आम्हाला एकदाही त्यांना फोन करावा लागला नाही. २) सकाळी चिमणगाव येथे न्याहारीसाठी थांबलो असताना तेथील रहिवासींनी आम्हाला स्वतःहून पाणी आणून दिले आणि





श्रीमहाराजांचे पाय आमच्या इथे लागले त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. ३) दुपारी आम्ही कृष्णा-कोयना मंगल कार्यालयाच्या आवारात जेवण करू का? म्हणून विचारल्यावर त्यांनी आम्हाला कार्यालय उघडून आतील मोठ्या हॉलमध्ये बुफे साठी सोय करून दिली. तेथे पंख्याखाली तासभर विश्रांती घ्यायला मिळाली. ४) श्री प्रमोद जोशी, श्री श्रीकांत शिर्लेकर आणि श्री विनय गद्रे हे संपूर्ण वारी (४८ किलोमीटर) चालले. ५) सौ संजीवनी कुलकर्णी यांचा ड्राईव्हर नागेश हा आपल्या ग्रुपमध्ये नवीनच होता पण तो सुध्दा फोटो घेऊन जप करीत चालला आणि म्हणाला काहीतरी वेगळं वाटतंय. ६) रस्त्यावरून जाणारे इतर लोक फोटोला लांबून नमस्कार करीत होते, आपला पायी वारीचा फ्लेक्स वाचीत होते. ७) छत्रे काकांची गाडी वारकऱ्यांच्या दिमतीला होती. आणि काही समस्या आली तर आपल्या बरोबर श्री अनिल पात्रुडकर (Dysp CID) हे होते त्यामुळे काळजीच नव्हती. वरील अनुभव आम्हाला श्रीमहाराज आणि श्रीब्रह्मानंद महाराज बरोबर असल्याची प्रचिती देऊन गेले. या सर्व घटना सुखद अनुभव देऊन गेल्या. संध्याकाळी ५ वाजता आम्ही सर्वजण एकत्रपणे श्रीब्रह्मानंद महाराजांबरोबर समाधिमंदिरांत श्रीमहाराजांचे दर्शन घ्यायला गेलो.

श्रीब्रह्मानंद महाराजांचा फोटो श्रीमहाराजांच्या समाधीला लावल्यावर जणू त्या दोघांची गळाभेट झाली हे दृश्य याची देही याची डोळा पाहताना सर्वांनाच आनंदाश्रू अनावर झाले. श्री प्रमोद जोशी चालत आल्यावर त्यांनी मनांमध्ये श्रीब्रह्मानंद महाराजांना तुम्ही आमच्याबरोबर असल्याची खूण द्यावी असे म्हणून समाधिमंदिरात प्रवेश करिताच श्रीब्रह्मानंद महाराजांची आरती सुरु झाली. ती आरती ऐकल्यावर त्यांच्या चेहऱ्यावरील अष्टसात्विक भाव स्पष्ट दिसत होते. कोणालाही कसलाच त्रास झाला नाही. रात्री सर्वांनी मिळून आपल्या बरोबर आणलेला खाऊ एकत्र करून गोपाळकाला केला. आणि आज पहाटे श्रीमहाराजांचे भावविभोर होऊन, दर्शन घेऊन सर्व मंडळी पुण्याला परतली. आरतीमंडळातील सर्वांच्या सदिच्छा, प्रेम, आपुलकी आणि आशीर्वाद यांच्या जोरावर हा उपक्रम शब्दात वर्णन करता येत नाही इतका संस्मरणीय झाला.

शिरीष जोशी, पुणे

# अक्षर सेवा




विलास पेंटर यांची मुलाखत सुरू करतानाच ,'ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज' असा उल्लेख मुलाखतकार सुहास गोळे यांनी करताच, विलास पेंटर लगेच म्हणाले, "अहो महाराज एकच आहेत नुसतं महाराजच म्हणा आणि तुम्ही मुलाखत घेत आहात हा तुमचा मोठेपणा आहे, मी काही त्या योग्य आहे असे मला वाटत नाही." सुहास गोळे यांचीच स्तुती करत म्हणाले कोरेगावहून तुम्ही इथे नेहमी येता, तुमचे वडील यायचे ही एक कमालच आहे ही महाराजांचीच कृपा बरं का!. सुहास म्हणाले, इथले सुवाच्य अक्षरातले फलक बघितल्यावर, हे कोण लिहितो? असं मनात आलं आणि सुरक्षा रक्षकाकडून कळलं आणि मग तुमच्याशी संवाद झाला. मला असं विचारायचं आहे, हे लिहिणं सुरू कसं झालं?

विलास पेंटर म्हणाले १९८६ सालापासून मी चालत गोंदवल्यात येत असे दहिवडीवरून. काही दिवस इथे लिहिलेल्या गोष्टी म्हणजे सूचना, फलक पाहून माझ्या मनातच येत असे, हे काम मला मिळालं तर... आणि काही दिवसातच इथे मोहन हसबे म्हणून होते. इथले काम पाहणारे सहस्त्रबुद्धे त्यांना एकदा म्हणाले की कोणी पेंटर मिळत नाहीये चांगला. तेंव्हा मोहनराव म्हणाले अहो रोज एक पेंटर महाराजांच्या दर्शनाला येतो की. तेव्हा सहस्त्रबुद्धे म्हणाले त्याला मला भेटायला सांगा. मी भेटल्यावर त्यांनी इथे आईसाहेब मंदिराजवळ असलेल्या जनरेटर साठी पाट्या लिहिण्यास सांगितल्या. मी दुसऱ्या दिवशी आणल्या. त्या पाहून ते खुशच झाले. माझे कौतुक केलं त्यांनी. महाराजांना स्मरूनच मी केलं त्यामुळेच खरंतर ते चांगलं झालं. मग त्यांनी मला इथले लिहिण्याचे काम करायला सांगितले व त्याचे पैसे विचारले. 'तेव्हा महाराजांचे काम म्हणून मी करणार! पैसे नका देऊ' असेच मी सांगितलं आणि काम हे सुरू झालं. विश्वस्तांमार्फत मात्र बरेच वेळा माझं कौतुक झालं. काही पैसे आणि वस्त्र वगैरे मला देत, तेव्हा पैसे मी पेटीतच टाकत असे. शर्ट पीस वगैरे श्रींचा प्रसाद म्हणून वापरत असे. इथे कपडे काढून जेवायला बसत असत. ते मात्र मला लाज वाटत असे आणि खूप भूक लागली तरच बाहेर जेवत असे. कित्येक वेळा तर मला कामात जेवणाचे भानच नसे. कित्येकदा न जेवता मी झपाटल्यासारखा काम करत असे आणि मग दहिवडीला घरी चालत जात असे.

१९८७ साल असेल अमृत महोत्सव होता तेव्हाची गोष्ट सांगतो. बांधकाम चालू होते

चैतन्य इमारतीचं! खूप पळापळ चालू होती माझी. दरवाजे रंगवायचं काम चालू होतं. खोल्या उत्सवात द्यायच्या होत्या. मला खूपच काम करावे लागत होते. तेव्हा डीसा म्हणून एक इथे इंजिनियर होते. ते माझं काम पाहून खुश झाले मला म्हणाले तुमच्यासारखं काम करणारा माणूस मला मुंबई पुण्यात दिसत नाही बघा. इतकं पटापट काम करता आणि तेही अतिशय सुंदर अक्षर असतं. ते म्हणाले तुम्हाला चहा तरी पाजायचाच आहे म्हणून मला ते अगदी प्रेमाने चहा पाजायला घेऊन गेले. अण्णासाहेब गाडगीळ इथे असत ते मला म्हणाले १ ते ४५ खोल्यांच्या पाट्यावर नंबर टाकायचे आहेत तेवढे बघा. मी दुपारनंतर संध्याकाळपर्यंत काम पूर्ण केलं आणि त्यांना सांगितलं. तर ते खुश होऊन "थँक्यू थँक्यू" इतकं कौतुकाने म्हणाले मला खूप बरं वाटलं. अहो तो खूप मोठा माणूस होता बरं का ! त्यांना दुसऱ्याच्या मनातलं कळत असे. त्यांना वाचा सिद्धी सुद्धा होती. एकदा असं झालं 'चैतन्य रुग्णसेवा' असा बोर्ड पेंट करून हवा होता पण रंग संपला होता. मी ठरवलं मागायचं नाही कुणाकडे आपल्याला पैसे आले की त्यातून रंग घ्यायचा. झालं असं तिसऱ्या दिवशी एक सेवेकरी होता त्याला अण्णा म्हणाले, आधी पेंटरला घेऊन ये. मी त्याला सांगू लागलो ते काम राहिलं आहे करतो मी. तो काही ऐकेना, ताबडतोब आण्णासाहेबांनी बोलावलं आहे म्हणाला. मी घाबरतच गेलो अण्णा साहेबांना भेटायला. त्यांना नमस्कार करता करताच ते म्हणाले, 'पेंटर रंग वगैरे जे काही लागेल ते खोलीतून घ्यायचं बरं का!' अहो  काय सांगू माझ्या डोळ्यातून पाणी वाहायला लागलं.

मला भरपूर अनुभव येत असतात महाराजांचे इथे. आज असं वाटतं की मी कसा होतो आणि महाराजांनी कसं घडवलं! माझे आई-वडील लवकर गेले मी आणि बहिण दोघेच. आईच अक्षर फार चांगलं असे तेच माझ्यात आलं. माझी बहीण सुरेख रांगोळ्या काढत असे. माझी मुलगी सुद्धा सुंदर रांगोळ्या काढते. हे परमेश्वरच देत असतो बघा. काय सांगायचं आम्हाला कोण होतं कोण सांभाळणार! कोण शिकवणार! मला हे काम सोडून इतर, सुतारकाम, लोहार काम सुद्धा चांगले येत. ही श्रीमहाराजांचीच कृपा आहे तेच सांभाळतात हो. इथे येणाऱ्या प्रत्येकाचा आधी काहीतरी संबंध आलेला असतो. गुरुशिवाय काही घडत नाही हो. कितीतरी संकटातून त्यांनी मला वाचवले. एकदा मी असंच खडू ने लिहिलेला बोर्ड एकाला खूप आवडला. त्यांनी त्याचे स्टिकर्स बनवले. सहस्रबुद्धे म्हणाले मला अहो तुम्ही बोर्ड तयार केला त्याचे त्या मुंबईच्या माणसाने स्टिकर केले बघा. अहो महाराजांनी गोंदवल्याचे वैशिष्ट्य सांगताना

## एक 'कलावंत' श्री महाराजांचा!

"कलावंत!" मी हाक मारली "अहो केवढा वारा सुटलाय, पावसाची झड अंगावर येत आहे! तरी मचाणावर आहात? या खाली लगेच, नाहीतर तब्येत बिघडेल!" पण 'ते' नुसतेच हसले! २०-२५ मिनिटाने ते खाली आले! मी त्यांना रागावलो तर पुन्हा हसून म्हणाले "अहो नाव अर्धवट राहिले होते. "मी विचारले" नंतर करता आले नसते का?"तर ते सहज म्हणाले" अहो नुसतेच चिंता लिहून झाले होते ना, तसेच कसे ठेवायचे? महाराजांच्या इथे चिंता? म्हणून त्यापुढे "मणी" लिहून आलो! आता 'भक्त-निवास' पाऊस थांबल्यावर लिहतो !"मी स्तब्ध झालो!" फक्त त्यांच्या पाया पडलो! हा श्रीमहाराजांचा हा खरा 'कलावंत' म्हणजे श्री विलास माने



म्हटले आहे गोंदवल्यात पैसा पिकत नाही, पण रामनामाचे भरपूर भांडवल मात्र मी इथे ठेवले आहे. इथे कितीही भ्रष्ट बुद्धीचा माणूस आला तरी त्याच्या बुद्धीत पालट झालाच पाहिजे. किमान त्याचा अंतकाळ तरी चांगलाच होईल. केवढी गॅरंटी आहे हो ही ! कोण अस आश्वासन देईल. मला सांगा. एकदा तर म्हणाले तुम्ही फक्त नाम घ्या बाकी सगळं मी करतो. पण आपण प्रपंचात गुरफटतो.

सुहास गोळे यांनी विचारलं, पेंटरचं खडूचं अक्षर आणि ब्रशनी लिहिलेलं अक्षर दोन्ही चांगल असतंच असं नाही तेव्हा पेंटर म्हणाले, अहो माझे दोन्ही चांगलच येतं. कधी कधी लोक पुसून बघतात. काहीजण म्हणतात लिहिलेलं नाही हे, कम्प्युटरवर तयार केलं असणार. एक जण तर उत्सवाचा लिहिलेला बोर्डवरच काहीतरी पुसत होता. मला वाईट वाटलं त्याला म्हटलं अहो का पुसताय तुम्ही? तर मलाच रागावून म्हणाला, तुम्हाला काय करायचय? त्यांना म्हटलं अहो रागवू नका. पुसण्याचे कारण विचारतोय मी फक्त, हे मीच लिहिलेले बोर्ड आहेत. तेव्हा मात्र त्याला काहीतरी वाटलं. मला सॉरी सॉरी म्हणू लागला. मला म्हणाला हे लिहिलेले आहेत की छापलेले आहेत ही खात्री करून पाहत होतो. इथे तशी बरीच काम केली आहेत मी. गाडी सुद्धा चालवली आहे. मी ऑफिसमध्ये सुद्धा काम केलं. पूर्वी एकदा स्वच्छता कामगार एकच होता इथे, तो कोल्हापूरला गेला. तेव्हा अण्णासाहेबांना म्हटलं, 'अण्णा मी संडास साफ करू का?' ते नको नको म्हणू लागले. तुम्ही कशाला करताय. म्हटलं खूप खराब झाले आहेत. भैय्या नाहीये. 'बर करा' म्हणाले. मग मी रोज दोन संडास साफ करू लागलो. अण्णांना फार भरून आलं. त्यांचं फार फार प्रेम होतं माझ्यावर, ते प्रेमळच होते हो. त्यांच्या रागाचे सुद्धा काही वाईट वाटत नसे. लगेच विसरून जात. एकदा इथे दहिवडीच्या मुलाने चोरी केली त्याला पकडून काही जणांनी मारलं. अण्णांनी त्याला बोलावलं आणि जेवायला घातलं आणि मगच पाठवलं. सेवेकरी आवळकर म्हणून एक वेडसर होता जरा इथे तो सकाळी नाष्टा करून गेला की कधीही येत असे दुपारी दोन अडीच वाजता. अण्णा सुद्धा त्याची वाट पाहत असत. अण्णांचे वैशिष्ट्य म्हणजे हुकमी झोप होती. विश्रांती घेत पाच मिनिट. पाच मिनिटांनी पहावं तर परत ते काम करत असत. १९८७ सालची गोष्ट असेल रात्री साखरेची गाडी आली मी आणि ऑफिसमधले एक जण आणि तिसरे गणेश गुरुजी असे तिघेच होतो. आम्ही प्रयत्न करू लागलो उतरवायला. शंभर किलोच पोतं काय उचलणार मला! तेवढ्यात अण्णा आले म्हणाले अरे काय करताय? गावातून त्यांनी मध्यरात्री हमाल बोलावले आणि मगच काम पूर्ण झालं. इथे कसलेही काम करायला कमीपणा वाटलं नाही. पूज्य बाबा बेलसरे सांगत, सेवा म्हणून तुम्ही हीनातलं हीन काम करा. कोणतंही काम हीन नसतंच. इथे कितीतरी मोठे ऑफिसर लोक झाडलोट करत असतात. संडास साफ करतात अगदी प्रेमाने आनंदाने काम करतात. इथे काम करतानाच आनंद होतो.

इथे काम करताना सुद्धा वाईट प्रसंग आले माझ्यावर. कोणी काही बोलत, कोणी काही बोलत. काम बंद पडे. कोणी काही आरोप करत तेंव्हा मी फक्त "महाराज महाराज" त्यांचं स्मरण करत असे आणि मग पुढे काहीतरी व्हायचं आणि परत तीच सेवा माझ्याकडे येत असे. सुहास गोळे म्हणाले तुम्ही फार निष्ठेने काम केलं. त्या निष्ठेबद्दल काही सांगा. अहो महाराजांचेच प्रवचन आहे पूज्य बाबा ते सांगत असं तुम्ही गप्पागोष्टी करता त्या मनापासून करा, खेळताना मनापासून खेळ खेळा. भांडण करताना सुद्धा मनापासून करा म्हणजे मग नाम सुद्धा मनापासून होईल. फक्त राग मात्र गळ्याखाली येऊ देऊ नका. राग विसरणं फार कठीण आहे हो! अहो महाराजांचे चरित्रात नाही का गोष्ट! त्यांच्या चुलत्यांशी त्यांचे भांडण व्हायचे. एक जण तर त्यांना दगड मारायला आला. पण महाराजांनी भांडण संपल्यावर त्याला जवळ बसवून प्रेमाने जेवायला घालूनच पाठवले. मी इथे सगळं मनापासूनच केलं.आणि खरं सांगतो नामस्मरणाशिवाय पर्यायच नाही हो!! काय सांगू.

# कै. नाना ई'नाम'दार

**श्री महाराजांच्या डोंबिवली उपासना केंद्राच्या संस्थापकांपैकी असलेले ज्येष्ठ साधक, कीर्तनकार, अभ्यासक श्री नाना ईनामदार यांच्या काही आठवणी**

– श्रीपाद दांडेकर, डोंबिवली



नाना जेव्हापासून आठवतात तेंव्हा पासून ते ज्याला त्याला मदत करणारे नानाच मला आठवतात. याला कारण म्हणजे मी चवथीत असताना (१९७९) मला पोस्टाची गणितं अभ्यासक्रमात होती आणि समजत नव्हती. माझ्या आईने नानांना हे रस्त्यात सांगितलं एकदा फक्त आणि त्यांनी त्यांच्या busy schedule मधून वेळ काढून माझ्या घरी येऊन मला गणितं शिकवली. पुढे त्यांच्या कीर्तनाला आईने नेले पण स्वतःहून त्यांच्याकडे मात्र मी १९९७ पासून जाऊ लागलो आणि आता दासबोधातली उत्तम पुरुष लक्षणे जी समर्थांनी सांगितली आहेत ती वाचताना नानांची आठवण नेहमीच होते. मला अतिशय स्तिमित करणारे गुण त्यांच्या अंगी दिसले ते वर्णन करणारी ओवी अशी... "आलस्य अवघाच दवडावा, यत्न उदंडची करावा। शब्द मत्सर न करावा कोणीयेकाचा॥" हे आणि इतर ही सद्भक्ताचे गुण दर्शन त्यांच्या ज्या आठवणीत दिसतं त्या आठवायचा माझ्या परीने प्रयत्न करतो. गोंदवले पुण्यतिथी उत्सव ते कितीतरी वर्ष जात होते. काही उत्सव ते गुलालाच्या वेळी पू. तात्यासाहेब यांच्या बाजूला मातीत खाली बसल्याची आठवण ही सांगत. आजी म्हणजे नानांच्या पत्नी मला म्हणत सगळ्या रजा duty करत असताना या उत्सवा साठी जपून ठेवत. मी मात्र त्यांचे वय ६५ नंतरच त्यांच्या बरोबर बरेच राहिलो.

१. मी पाहिलेली त्यांची (after retirement) दिनचर्या अशी की आळसाला तिथे प्रवेश करायला जागाच नव्हती. साधारण पहाटे साडेतीन आसपास उठून नाम घेणे, मग साडेपाच नंतर काकड आरती, भजन मग स्नान संध्या पूजा सूर्यनमस्कार (त्यांच्या ७७ व्या वर्षी मी आणि त्यांनी सज्जनगड येथे मारुती समोर २० सूर्यनमस्कार घातल्याचे मला अगदी चांगले आठवते) त्यानंतर घरकामात आजींना मदत किंवा बाहेर ची कामं भाजी आणण्यापासून, आणल्यावर नाम घेत पालेभाजी निवडताना मी त्यांना अनेकदा पाहिले. पुढे नैवेद्य मग भोजन प्रसाद अगदी थोड्यावेळ वामकुक्षी दुपारी तीन वाजताही आतल्या खोलीत देवघरासमोर नाम घेताना डोलणारे नाना खुपदा मी पाहिले आहेत. साधारण साडेचार आसपास नित्यनेम पोथीवाचन विष्णू सहस्र नाम रामहृदय नामाचा समास हे झाले की चहा असे. गंमतीची आठवण म्हणजे माझ्या लग्नाच्या

आदल्या दिवशी लांबून आलेल्या माझ्या आजीला मी या पाच वाजता होणाऱ्या नित्य नेमासाठी घेऊन गेलो होतो बाहेर पडल्यावर आजी म्हणली खरं म्हणजे मला चष्मा लागतोच वाचताना, पण आज मात्र तो नसताना नित्योपासना पुस्तकातलं मला सगळं वाचता आलं. संध्याकाळी कोणी हॉस्पिटलमध्ये असल्यास त्यांची गाठ घेऊन आधार देणारं बोलणं असे किंवा शनिवार भजन जिथे arrange करायचं त्यांच्याकडे स्वतः भेटुन ठरवणे असे, संध्याकाळची आरती स्तोत्रे झाल्यावर जेवण, मग एकादशी असल्यास रात्री त्यांच्या घरीच भजन, शनिवार असल्यास त्यांनी ज्या भक्ताची घरी ठरवले असे तिथे असे. उत्सवाला त्यांचा उत्साह तरुणाला लाजवणारच असायचा. पुण्यतिथी उत्सवात तर ते अडीच वाजताच जपाला बसत असत. कारण काकड आरती ४.४५ सुरू होते त्या आधी जप स्नान संध्या. मी १९९८ उत्सव पहिल्यांदा गेलो होतो. रोज ४.१५ वाजता माझ्या कपाळावरून प्रेमाने हात फिरवून उठा महाराज असे म्हणून उठवत असतं. तिथे रात्री वाढण्याची सेवा शेवटच्या पंगती पर्यंत करण्यासाठी त्यांचा कटाक्ष असे व तशी प्रार्थना निघताना प्रत्येका कडून करवून घेत असत आणि मगच निघत असत. रात्री स्वतः न जेवता ते परतत व हॉल मध्ये मी झोपत असे तेंव्हा ते नाम घेताना च दिसत. हा दिनक्रम मी त्यांच्या शेवटच्या दिवसांपर्यंत पाहिला आहे.

२. गुढी पाडवा पहिल्यांदा शोभा यात्रा निघाली तेव्हाची आठवण अशी की कीर्तनकुलातर्फेही याबद्दल काही जणांनी सगळ्या लोकांनी सहभागी व्हावे म्हणून आवाहन केले जात होते. नानांनासुद्धा सांगितलं होतं पहाटे भागशाळा मैदानात जमायचं आहे म्हणून. मी अर्थातच मूर्तिमंत आळशी असल्याने नाहींच गेलो पण आईने शोभा यात्रा पार पडून घरी आल्यावर सांगीतले की ब्रह्मचैतन्य भजनी मंडळ अशी पाटी घेऊन नाना स्वतः सगळ नित्यनेम आवरून पाच वाजता भागशाळा मैदानात एकटेच उभे होते. Including आणि इतर यात्रा पार पाडून आलेले सगळे थकून घरी येऊन आडवे पडले होते. मी थोडयाच वेळाने नानांच्या घरावरून जात असताना नानांनी मात्र नेहमीच्याच प्रसन्नतेने "या महाराज" अशी मला हाक मारली. मी भेटलो तर थकल्यांचा मागमूस नव्हता हे पाहून थक्क झालो. ते नेहमी म्हणत नाम



धारकाच शरीर हलकं असाव. शेवटी हॉस्पिटल मध्ये भरती केलं त्या दोन दिवस आधी compound मधील चाफ्याच्या झाडावर चढून फुल काढताना मी आणि शौनक नी (त्यांचा नातू) त्यांना पाहिलं होत.

३. एकदा शनिवारच भजन वी आ. बुवा (कल्याण) यांच्या घरी ७ वाजताच ठरलं होत कारण नंतर भोजन प्रसाद सुद्धा होता. सहा दरम्यान ट्रॅक्स येणार आणि एक रिक्षा ठरविली होती पण पाऊस जोराचा आणि पावणे सात वाजत आले तरी कुठलच वाहन आलं नाही तेंव्हा सगळे कंटाळले, इनामदार आजी म्हणाल्या आता कुठे जाताय करा इथेच भजन. तेंव्हा नाना शांतपणे म्हणाले अहो तुम्ही स्वयंपाक घरातलं बघा. अस म्हणून शेवटी बऱ्याच प्रयत्नानंतर दोन रिक्षात तबला पेटी आणि सगळे कोंबून बसलो आणि गेलो. भजन अर्थातच खूप रंगले. परत आलो तेव्हा सारदळ काका मर्म बोलले ते म्हणाले असा positiveness आज दिसत नाही म्हणून देशाची वाट लागत आहे. महाराजांचे भजन, त्यांची सेवा यात कसलाही compromise त्यांना चालत नसे. त्यासाठी देहाची पर्वा ते करत नसत.

४. नानांच्या घरासमोरून मी सकाळी एकदा ड्युटीवर जात असताना त्यांनी हाक मारली समीर थांब काकडाआरती प्रसाद घेऊन जा. माझ्या मनात पहिलं आलं आपली train आता चुकणार. पण नाना धावत लोणीसाखर बाहेर घेऊन आले बूट काढू नकोस म्हणाले गेट मध्येच त्यांनी मला भरवले म्हणाले हात धुण्यात वेळ नको जायला, खाल्यावर लगेच त्यांनी त्यांच्या धोतराच्या सोग्याने माझे तोंड पुसले आणि पाठीवर थाप मारून म्हणाले या महाराज अश्या प्रेमात मला कधीही कृत्रिमता दिसली नाही आणि असे प्रेम ते अनेकांवर करत असत.

५. नानांकडेच भजनाला येणारे काही मित्र यांनी एक जीप ठरवून गोंदवल्याला जायचे ठरवले. सगळ्यांनी नानांच्या घरीच जमायचं आणि निघायचं ठरवलं पण काही कारणांनी jeep आलीच नाही. तेंव्हा काहीजण घरी गेले तर मी आणि इतर दोन जण तिथेच हताश होऊन बसलो तेंव्हा नाना म्हणाले अरे निराश का होता इथे महाराज आहेतच आपण इथेच गोंदवल्यातली सगळी उपासना करू लगेच भजन (गोविंद राधे गोविंद) झालं. न्याहारी झाली तास भर नाम झाले आणि मग प्रत्येकाने आपल्या परीने आजींना मदत केली प्रसादासाठी. संध्याकाळ पर्यंत सगळा नित्यनेम गोंदवले प्रमाणेच पार पडला. त्या मित्रांपैकी एक जण अजूनही २५ वर्षांनंतर त्या आठवणीने गहिवरतो. त्यात ट्रिप cancel झाली हे घरी न कळवता तसाच संध्याकाळ पर्यंत नानांकडे राहिलो म्हणून माझे वडील तिथे येऊन मला बरंच काही नानांसमोर ओरडले. नानांनी त्यांच्यासमोर हात जोडून चूक माझी अस सांगून त्यांची बोळवण केली व मला म्हणाले महाराजांचे स्मरण व्हावे म्हणून आपण हे करत आहोत तेंव्हा अश्या प्रसंगी दगड बनून शांत रहावे.

६. थोर सत्पुरूष पू. मामा देशपांडे यांच्या संप्रदायातील प्रसिद्ध संत साहित्य अभ्यासक आणि साधक रोहन उपळेकर यांना मी लहानपणा पासून ओळखतो. त्यांचे आजोळ डोंबिवलीत त्या निमित्ताने साधारण त्यांचे वय चवदा वर्ष असावे रोहनचे आमच्या घरी आला असताना त्याला घेऊन मी नानांकडे गेलो. घरात शिरल्याबरोबर नानांना म्हटले फलटण चे सत्पुरूष उपळेकर महाराज यांचा हा नातू. तत्क्षणीं कसलाही विलंब न लावता नानांनी रोहनच्या पायावर डोक ठेवून साष्टांग नमस्कार घातला. त्यांची लीनता पाहून पू. बाबा नेहमी प्रवचनात एक दासबोधातली ओवी सांगत ती आठवली... “लीनते सारखे रत्न, उदंड केला जरी प्रयत्न। तरी न साधे परी यत्न केला पाहिजे॥”



७. २००० साल असावे पुण्यतिथी उत्सवात नानांबरोबर मी नामसाधना मंदिरात बसलो होतो दीड तासाने उठताना माझ्या पाठीवर हात फिरवून म्हणाले असं मंदिर डोंबिवलीत व्हावं अस मला फार वाटतं. पुढे अनेक घडामोडी होऊन श्री ब्रह्मचैतन्य आराधना केंद्र, पांडुरंगवाडी, डोंबिवली हे साकार झालं, तिथे नाम घेणे आणि शनिवारचे भजनासाठी नानांबरोबर उपस्थित राहता आलं हे माझं भाग्यच. नानांना आवडणाऱ्या दोन्ही गोष्टी आजही निष्ठेने चालू आहेत ते पाहून त्याचं स्वप्न पूर्ण झालं असच वाटतं. काही प्रसंगी ते बोलत असतं आणि पुढे तसेच घडत असे हे मी स्वतः अनुभवलं आहे. ते कीर्तन करत असत, त्यात काही तपशिल चुकीचे असत काही वेळा पद्य म्हणताना ताल ही चुके पण त्यांचा भाव इतका सच्चा असे की श्रोत्यांमध्ये कुणालाही या गोष्टीने त्रास होतच नसे. महाराजांच्या उत्सवातली कीर्तन असोत किंवा बाजी प्रभू चौकात रस्त्यावर हनुमान जन्म असो, मुरबाड आणि मालाड इथे झालेले कीर्तन मी स्वतः ऐकले आणि एक गोष्ट नेहमी दिसली ती कीर्तन संपल्यावर त्यांच्या चेहऱ्यावर वेगळीच प्रसन्नता दिसे, ते गुढग्यावर बसून श्रीमहाराजांकडे काही वेळ बघत असत त्यांना काहीवेळ आपल्या आजूबाजूचे भान नसे असे वाटे. त्यांच्या बरोबर प्रवास करताना पाहिलेली गोष्ट म्हणजे ST त बसल्यावर समोरच्या हॅण्डल वर महाराजांचा फोटो ठेवत आणि प्रवास भर त्याकडे पाहत नाम घेत असत. त्यांनीच मला सांगितलं आम्ही कामावर जायचो तेंव्हा लोकल ट्रेनमध्ये गर्दी नसे. आम्ही ठरवून ठेवले होते डोंबिवली ते दिवा प्रपंचाचे बोलायचे दिवा सुटल की डोळे मिटून VT येई पर्यंत नाम घ्यायचे मगच डोळे उघडायचे. घरातून बाहेर पडताना आणि घरात आल्यावर महाराजांच्या तसबिरी समोर “दयानिधेऽऽ” अशी हाक मारून साष्टांग नमस्कार घालताना मी नेहमीच पाहत असे. पेटीवर श्रीमहाराजांना खूप पूर्वी नाना एकदा भेटले आणि म्हणाले घरातील लोक नाम घेत नाहीत तेंव्हा श्रीमहाराज त्यांना म्हणाले “तुम्ही नामात रंगून जा” मग घेतील घरातील. पुढे घरातील काहीजणच काय पण त्यांच्या घरात येणारे बहुतेक जण नाम घेऊ लागले हे सर्वांना ठाऊक आहेच.

नानांना जेव्हा शेवटचे हॉस्पिटल मध्ये ठेवले होते तेव्हा तिथे पहायला गेलो तेव्हा तिथल्या घरातल्या मंडळींनी सांगीतले ते मध्येच शुद्धी वर येतात आणि दोन दिवसांनी कृष्णाष्टमी उत्सव आहे त्याबद्दलच बोलतात की मी बसून प्रवचन करेन, खुर्चीत बसून नाम घेऊ वगैरे. पू. बाबा बेलसरे यांनी म्हटले आहे साधक कितीही मोठा असला तरी आपण त्याच्या देह सवयींकडे न पाहता त्याची नामनिष्ठाच घ्यावी. जी नानांकडे भरपूर होती. नाना अनेकदा महाराजांच्या समोर रामपाठातील महाराजांचेच शब्द भाविकतेने म्हणत असत तेच मी आता महाराजांकडे मागतो **“तुझ्या भक्तांची संगती मज घडो सर्वदा.”**






# श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज आराधना केंद्र १, डोंबिवली

श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज आराधना केंद्र डोंबिवली या संस्थेची सुरुवात श्रीमहाराजांच्या आज्ञेने व प.पू. बाबा बेलसरे यांच्या पाठिंब्याने (अनुमतीने) झाली. त्या मागची कथा थोडक्यात अशी की कै. नाना इनामदार हे श्रीमहाराजांचे निस्सिम भक्त होत. ते कीर्तने करीत. त्यांची गोंदवले मध्ये पुण्यतिथीला कीर्तन होत असत. साधारण १९७० सालापासून नानांनी व त्यांचे सहकारी साधक यांनी दर शनिवारी भजन मंडळ (फिरत्या स्वरूपात) चालू केले होते. डोंबिवली येथील सर्व साधक पुण्यतिथीला गोंदवले तर गुरुपौर्णिमेला मालाड येथे जात असत. १९८०-८१ सालच्या गुरुपौर्णिमेला काही अपरिहार्य कार्य कारणामुळे मालाड येथे डोंबिवली येथील मंडळी पोहोचू शकली नाही व उत्सव डोंबिवली येथे त्यांना करावा लागला. त्या उत्सवानंतर कै. नाना व प.पू. बाबा बेलसरे यांची भेट मालाड येथे झाली., त्यावेळी श्रीमहाराजांनी पू.बाबा बेलसरे यांच्या मार्फत संकेत दिले की श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची उपासना व उत्सव डोंबिवली येथे सुरू करावा म्हणून. त्यानुसार श्रीमहाराजांचे जन्मोत्सव श्रीराम नवमी गोकुळाष्टमी व गुरुपौर्णिमा उत्सव सुरू होते. तसेच नित्य शनिवारी भजन सुरू होते. १९८४ ते २००० पर्यंत वरील सर्व उत्सव/भजन दर शनिवारी आणि एकादशीला फिरत्या स्वरूपात म्हणजे जशी जिथे जागा उपलब्ध होईल तिथे होत असे. स्थिर व कायमस्वरूपी जागा नव्हती अशी खंत महाराजांच्या अनुग्रहित साधक मंडळींमध्ये सलत होती.



त्यावेळेस नाना व काही साधक मंडळी यांनी २००१ साली श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर

श्रींची उपासना केंद्रे

महाराज आराधना केंद्र या संस्थेची स्थापना केली. तत्पूर्वी आदरणीय बापू काका दामले यांच्याकडून तशी अनुज्ञा घेतली व श्रीमहाराजांच्या समाधी वर जाऊन सर्व वृत्तांत महाराजांना विदित केला. त्यामुळे श्री महाराजांच्या प्रेरणेने डोंबिवली येथील मानपाडा रोडवर कै.कान्हे बुवा यांचे श्री विठ्ठल मंदिर श्रीमहाराजांच्या उपासनासाठी उपलब्ध झाले. त्यानंतर २००६-०७ साली मंदिराची जागा संस्थेकडून विकत घेण्यात आली व मंदिराच्या जीर्णोद्धार नूतनीकरण करण्यात आले. २०११ रोजी चैत्र पौर्णिमेला श्रीमहाराजांच्या कृपेने व गोंदवले येथील विश्वस्तांच्या सहकार्याने श्रीमहाराजांच्या स्थिर पादुका स्थापना आदरणीय श्री.परांजपे काका यांच्या हस्ते झाले.



**मंदिरातील उपक्रम**: मंदिर दररोज सकाळी ८:०० ते १२:३० व दुपारी ५:०० ते ८:०० उघडे असते. दररोज सकाळी ११:०० ते १२:२० विष्णुसहस्त्रनाम राम हृदय व दुपारी आरती दररोज संध्याकाळी ५:०० ते ६:०० नामजप दररोज सायंकाळी ७:०० ते ८:०० सायं उपासना व आरती दर एकादशीला सायंकाळी ६:०० ते ७:०० कीर्तनदर शनिवारी सायंकाळी ६:०० ते ८:०० भजन प्रत्येक पौर्णिमा सकाळी साडेसहापासून काकड आरती जप दुपारी साडेबारा ते दोन महाप्रसाद १३ तास अखंड नामस्मरण. इतर उत्सव गुरुपौर्णिमा, गंगादशहरा, गीता जयंती, गोपाळकाला, श्रीराम नवमी, असे वर्षभर उत्सव सुरू असतात.



**सामाजिक उपक्रम**: विद्यार्थ्यांना संस्थेतर्फे शैक्षणिक मदत. गरजू रुग्णांना वैद्यकीय मदत केली जाते. श्रीमहाराजांच्या कृपेमुळे दिवसेंदिवस मंदिरात साधकांचा ओघ वाढत आहे. तसेच सगुणोपासना, नामस्मरण अन्नदान या श्रीमहाराजांच्या त्रिसूत्री वर संस्थेचा भर असल्याने कीर्तन/प्रवचन/उत्सव/पौर्णिमा यास डोंबिवली व आजूबाजूच्या मुंबई परिसरातील भक्तांचा भरघोस प्रतिसाद असतो. वरील सर्व उपक्रम श्रीमहाराजांच्या इच्छेने व कर्तुंम अकर्तुंम या सत्तेने चालू आहे हे संस्थेतील विश्वस्त व कार्यकारी मंडळ यांचा ठाम विश्वास आहे. अशी सेवा महाराज करून घेवोत ही श्रींच्या चरणी प्रार्थना.

**संपर्क**: श्री शिरीष शेंबेकर: ८७७९४०१३००  श्री उमेश गोडसे: ९९२०४३४१०५

श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज आराधना केंद्र १, पांडुरंग कृपा सोसायटी, पहिली गल्ली, गावदेवी मंदिरासमोर, मानपाडा रोड, डोंबिवली (पूर्व) ४२१२०१

## श्रीरामसमर्थ

माझे होणे म्हणजे मी सर्वत्र आहे हे ओळखून जगात व्यवहार करणे, मला वाटते की तुम्ही माझे झाल्याशिवाय मला तुमचे होता येणार नाही, तरी तुम्ही माझे व्हा, नामाला न विसरता माझी आठवण सार्वत्रिक ठेवणे यालाच माझे होणे म्हणतात. भाविकपणे जो मला शरण आला तो माझे भावाप्रमाणे मी म्हणतो, म्हणजे मी- तो यात अंतर राहात नाही, मला वाटते की तुम्ही माझे आहात, पण तुम्हास हे ठाऊक असले पाहिजे की तुम्ही माझे असला तरी नामाला विसरून चालणार नाही, नामाला मी माझा प्राण समजतो, नामाशिवाय वेळ फुकट घालविणे म्हणजे माझी अवज्ञा करणे आहे, जाता जाता मी तुम्हास एकच सांगतो की तुम्ही माझे झाला आहात, तुम्हास कसली काळजी करण्याचे कारण नाही. भावाचा मी भुकेलेला आहे, तो ठेवा म्हणजे तुम्ही काय कराल ते मी आपलेसे करून घेईन

चार दिवस झाले तुम्ही माझेकडे येत आहा पण मी तुम्हास काहीच प्रसाद दिला नाही, तरी तुम्हास मी सांगतो की तुम्ही माझे प्रसादातच आहा. तुम्ही माझे झालात म्हणजे मला वाटते की तुम्ही आणि मी दोघे एकत्रच राहू. शास्त्रासारखे वागणे, त्यातच व्यवहार सांभाळणे, त्यातच साधन न सोडणे यातच खरा परमार्थ आहे, हे तुम्हास चांगले साधले आहे, तसेच वागत जा. मला वाटते की भावाने सर्व गोष्टी जुळून येतात, तसेच निष्ठा असली म्हणजे माझ्या म्हणण्याचा अर्थ कळुन येतो, गाताना मला झोप येते म्हणजे मी त्यात तल्लीन झालो आहे असे जे म्हणतात

श्रीमहाराज
# उपदेशामृत

तसेच नामावर लक्ष ठेवल्यास तसेच होईल याचा अर्थ इतकाच की नामावर विश्वास ठेवावा म्हणजे प्रतीतीला वेळ नाही. नामी म्हणजे ज्याचे नाम आपण घेतो तो, त्यालाच नामी म्हणावे व जो ते नाम घेतो तो नामीच होय, म्हणजे दोघेही एकरूपच होतात. हृदयात परमात्मा आहे हे खरे, त्याची आठवण करणे म्हणजे माझे होणे आहे. याचा भावार्थ हा आहे की तुम्ही माझे झाल्याशिवाय सर्व गोष्टी कळण्यास फार कठिण जाते, परंतु तुम्हास मी सांगून ठेवतो की तुम्ही माझे आहातच, त्यामुळे मी वेळ आली म्हणजे सर्व सांगून देईन, तुम्ही त्याचे मागे जाऊ नये. वैखरीने नाम घेणे म्हणजेच यातायातीतून मुक्त होण्यासारखे आहे, ते तुम्हांस फायदेशीर होईल, “वाचेने नाम व हाताने काम त्यास जोडे आत्माराम” हे माझे म्हणणे तुम्हास ठाऊक असेलच त्याप्रमाणे वागावे म्हणजे तुम्ही माझे व्हाल व तसे झाले म्हणजे मला तुम्ही आपलेसे केलेसे होईल. मी तुम्हास खात्रीने सांगतो की तुम्ही माझे झाला की मी तुमचाच आहे, फार काय सांगू; तुम्ही व मी दोन नाही पण तुम्हाला माझे सांगण्याप्रमाणे करणे आहे व ते तुम्ही केल्यास आपण दोघेही एकच आहोत.

**।। जयजय रघुवीर समर्थ ।।**

संदर्भ: श्री बापूसाहेब साठे यांच्याकडील संकलीत असलेले श्रीमहाराजांचे सांगणे.